**यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे या संस्थेतील एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत “प्रकल्प सहायक” या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन आदेश क्र. प्रतिनि २०२६/प्र.क्र.४५/प्रशि-४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २४ एप्रिल, २०२६.

संदर्भ :-

१) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्या-१२, दि.१७.१२.२०१६.
२) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या-१२, दि.१६.०२.२०१८.
३) यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे यांचे पत्र.क्र.प्रशा-१/२०२५/नेमणूक-सीपीटीपी-प्रतिनियुक्ती, दि.२१.११.२०२५
४) महसूल व वन विभाग यांचे पत्र क्र.R&FD-15071/10/2026-MRF (DESK E9), दि.१२.०३.२०२६

**शासन आदेश :-**

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे या प्रशिक्षण संस्थेतील एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत रिक्त असलेल्या “प्रकल्प सहायक” या पदावर प्रतिनियुक्ती धोरणाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने श्री.राजेंद्र बाळकृष्ण बकरे, नायब तहसिलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय शेवगाव,जि.अहिल्यानगर यांची खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे. :-

| अ.क्र. | नाव /पदनाम/वेतनश्रेणी | मुळ प्रशासकीय विभाग | प्रतिनियुक्तीचे पद/ वेतनश्रेणी | प्रतिनियुक्तीचा दिनांक | प्रतिनियुक्तीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.राजेंद्र बाळकृष्ण बकरे, नायब तहसिलदार वेतनश्रेणी (एस-१४) | महसूल व वन विभाग | प्रकल्प सहायक वेतनश्रेणी (एस-१४) | आदेशाच्या दिनांकापासून | ३ वर्षे |

२. त्यानुसार महसूल व वन विभागाने श्री.राजेंद्र बाळकृष्ण बकरे, नायब तहसिलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय शेवगाव,जि.अहिल्यानगर यांच्या प्रतिनियुक्तीची नोंद घेवून आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. सदर प्रतिनियुक्ती महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा....) नियम १९८१ च्या परिशिष्ट- २ मधील खालील अटी व शर्तींच्या अधीन राहील. :-

१) प्रस्तुत प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी संबंधित विभागास लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने सेवेची आवश्यकता वाटल्यास सदर अधिकाऱ्यास परत बोलविण्यात येईल. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे या संस्थेस वरील अधिकाऱ्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास संबंधितांना ३ महिन्याची नोटीस द्यावी लागेल. त्याचप्रमाणे शासनास सदर बाब अवगत करण्यात यावी.

२)   प्रतिनियुक्तीवर असतानाच्या कालावधीतील वेतनाचा/रजा वेतनाचा खर्च यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे  या संस्थेने करावा.

३)   महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा....) नियम १९८१ च्या परिशिष्ट-४ मध्ये विहित केलेल्या दरानुसार यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे  या संस्थेकडून रजा वेतन व निवृत्ती वेतन अंशदान देण्यात यावे.

४)   सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीमधील वर्गणी चालू ठेवण्यात यावी.

५)   संबंधित अधिकाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी करावयाची झाल्यास त्यांच्या सेवा मूळ विभागाकडे परत करण्यात याव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४२४१७३९१७४४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NAMRATA SHASHANK BHARSAKHALE

Digitally signed by NAMRATA SHASHANK BHARSAKHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=afc239a04f8765fdfaff5b427895a52f52390a276568759df519aea12578512c, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E7A55E217A5A7B81D43819C528413DCC573FB455C923C289F62184B4155ED280, cn=NAMRATA SHASHANK BHARSAKHALE
Date: 2026.04.24 17:40:02 +05'30'

**(नम्रता भारसाखळे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति, :-**

१) महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे
२) विभागीय आयुक्त, पुणे
३) उपसचिव,(ई-९) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
४) जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर
५) निवासी उपजिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,जि.अहिल्यानगर
६) निबंधक तथा सहायक प्राध्यापक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे
७) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
८) सहायक लेखा अधिकारी, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे
९) श्री.राजेंद्र बाळकृष्ण बकरे, नायब तहसिलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय शेवगाव,जि.अहिल्यानगर
१०) निवडनस्ती/प्रशि-४.